# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेलः adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०.११.२०२०**

**जिल्हा : सांगली**

| मागील आठवड्यातील हवामान (१४.११.२०२० ते २०.११.२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२१.११.२०२० ते २५.११.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | दिनांक | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| | ० | ० | ०.४ | ० | - | - | पाऊस (मिमी) | ८ | ४ | ३ | ० | ० |
| ३०.४ | ३२.४ | ३३.६ | ३१.७ | ३३.२ | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३३ | ३३ | ३० | ३० |
| २०.१ | १९.८ | २१.३ | २१.२ | २२.८ | - | - | किमान तापमान (अं.से.) | २० | १९ | २० | २० | १८ |
| ३ | ० | ३ | ३ | ५ | - | - | ढग स्थिती (आकाश) | ६ | ६ | ५ | ३ | २ |
| ८८ | ८३ | ७९ | ८२ | ८५ | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७० | ७० | ७२ | ६१ | ५१ |
| ६५ | ५२ | ४९ | ७१ | ६१ | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४१ | ४२ | ४३ | ४३ | ३३ |
| १.९ | ० | १.९ | ३.७ | १.९ | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ६ | ६ | ९ | ११ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | आ. | पु. | ई.पु. | पु. | ई.पु. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यात दिनांक २१ ते २३ नोव्हेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या शक्यता आहे. कमाल तापमान ३०.० ते ३३.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १८.० ते २०.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०५ ते ११ कि.मी. दरम्यान राहील. |
| सामान्य सल्ला | | ➢ पिकांवर कीटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करताना स्टीकर चा वापर करावा.<br>➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| संदेश | | ➢ दिनांक २३ नोव्हेंबर पर्यंत हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. |
| गहू | अंकुरणे | ➢ गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबर नंतर उशिरा केल्यास प्रत्येक पंधरावाड्यास हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादन कमी येते त्यामुळे १५ डिसेंबर नंतर पेरणी करणे टाळावे. |
| मका | वाढीची | ➢ अमेरिकन लष्करी आळीचे नियंत्रण :<br>➢ रासायनिक नियंत्रण: १. आळीच्या वाढीच्या सुरवातीच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निंबोळी अर्क ५%यांची ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा २. थायमेथोक्झाम १२.६ %+ लॅम्डा सायहेलोथ्रीन ९.५ % झेड सी. या मिश्र किटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा ३. क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ % एस.सी. या किटकनाशकाची ०.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी |
| रब्बी ज्वारी | वाढीची अवस्था | ➢ पिकामध्ये निंदनी/ कोळपणी करून तणनियंत्रण करावे.<br>➢ कोरडवाहू पिकामध्ये जमिनीमधून ६० ते ७० टक्के ओलावा बाष्पीभवनामुळे नाहीसा होतो त्यामुळे जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी शेतातून काढलेले तण, तुरकाड्या यांचा वापर करून आच्छादन करावे. |
| हरभरा | अंकुरणे | ➢ पहिली कोळपणी पेरणीनंतर २० दिवसांनी करावी.<br>➢ पिक पाण्यास अतिशय संवेदनशील असल्याने गरजेपेक्षा जास्त पाणी दिले गेल्यास पिक उभळते.<br>➢ तुषार सिंचन पद्धतीचा वापर केल्यास उत्पादनामध्ये मोठी वाढ होते. तुषार सिंचनपद्धीतीमुळे पिकास दिलेली खते पिकास व्यवस्थित उपलब्ध होतात. |
| ऊस | पूर्वहंगामी : लागवड | ➢ पूर्व हंगामी ऊस लागवड जमिनीमध्ये वापसा आल्यावर करावी. लागवडीसाठी को.८६०३२(नीरा), को.एम.०२६५(फुले २६५), एम.एस.१०००१ (फुले १०००१),को.९४०१२(फुले सावित्री), को.सी.६७१(वसंत-१) या जातींची निवड करावी.<br>➢ बेणे प्रक्रिया: बुरशीजन्य रोग व खवले किड याच्यापासून प्रतिबंधासाठी ऊस बेणे लागणीपूर्वी १०० लिटर पाण्यात |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | डायमेथोएट ३० % प्रवाही २६५ मिली मिसळून १० मिनिटांसाठी बुडवून ठेऊन बेणे प्रक्रिया करावी. |
| | आडसाली : तोडणी | ➢ उस तोडणी हंगामनिहाय व पक्वता पाहून करावी. तोडणीपुर्वी पिकाचे पाणी १५ दिवस बंद करावेव तोडलेला उस ताबडतोब गळीतास पाठवावा. पूर्वहंगामी ऊसाची १४ ते १५ महिन्यात आणि आडसाली ऊसाची १६ ते १८ महिन्यात तोडणी करावी.<br>➢ उसाचे पाचट व्यवस्थापन<br>➢ ऊस तोडणी झाल्यानंतर उसाचे पाचट कुजवीणेसाठी पाचटावर एकरी एक पोते युरिया व एक पोते सिंगल सुपर फॉस्फेट व त्यांनतर एकरी चार किलो पाचट कुजविणारे जीवाणू टाकावे. |
| **वाटाणा** | पेरणी | ➢ रब्बी हंगामामध्ये वाटाणा पिकाची पेरणी जमिनीस वापसा आल्यावर नोव्हेंबर महिन्यामध्ये करावी. पेरणीसाठी बोनव्हिला, अरकेल, फुले प्रिया या सुधारित वाणांची निवड करावीत. लागवड ३०x१५ सें.मी. या अंतरावर करावी.<br>➢ बीज प्रक्रिया: पेरणीपूर्वी बियाण्यास कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिम ३ ग्रॅम या प्रमाणात प्रती किलो बियाण्यास चोळावे.<br>➢ पेरणीपूर्वी रासायनिक खतांची मात्रा १५ किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ६० किलो पालाश प्रती हेक्टरी द्यावी. |
| **मिरची** | वाढीची | ➢ फुलकिड्यांचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८% एस.एल.५मिलि किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ पशुधनासाठी मका, ओट, बरसीम, लसूनघास व ज्वारी या चारा पिकाची लागवड जमिनीत वापसा असल्यास करावी. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. :२०.११.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**